# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/12/2023 (शनिवार) सायंकाळ


---

### मोटरसायकल चोरी

**१) पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत ०३ किमी अंतरावर मौजा रूईखैरी बाजार येथे दिनांक ०५/१२/२०२३ चे २१.०० वा. ते २२.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– महेश उत्तमराव तुमडाम, वय ३९ वर्षे रा. वार्ड नं ०२ प्रभाग क्र. ०८ छोटी बोरी ता. जि नागपूर हे रूईखैरी येथे बाजार घेणे करीता आपली मोटरसायकल MH-40 BY-5406 ही वनविभागचे समोर रोडचे बाजुला उभी करून बाजार करण्याकरीता गेले असता बाजार करून परत आले तेव्हा त्यांना त्यांची डिलक्स लाल रंगाची असलेली मो.सा क्र. MH-40 BY-5406 किंमती १५,०००/– दिसुन आली नाही फिर्यादी यांनी तिचा आजुबाजुला शोध घेतला परंतु मिळुन आली नाही फिर्यादीची मोटारसायकल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रविण देव्हारे मो. क्र. ९८२२३९४५९७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत १३ किमी अंतरावर मौजा धानला येथे दिनांक ०७/१२/२०२३ चे १८.०० वा. ते २०.३० वा. दरम्यान यातील दि. ०७/१२/२०२३ रोजी फिर्यादी नामे– अशोक उर्फ दिनेश नामदेवराव पत्रे, वय ४६ वर्ष रा. धानला याच्या अंगणात मोटरसायकल हिरो होन्डा पॅशन प्लस लाल रंगाची गाडी जिचा नंबर एम. एच.– ४०/ ६४९१ किंमती अंदाजे २५०००/– रूपये असे असून गाडी उभी ठेवली होती अंदाजे रात्री ०६.०० वा. ते ०८.०० वाजताच्या दरम्यान अंगणात पाहिले असता गाडी दिसली नाही. आजूबाजूला शोध घेतला असता दिसून आले नाही. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा यंगलवार मो. क्र. ९४२३२१९४२९ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर